९५

# महाराष्ट्र सावकारी (नियमन) अधिनियम २०१४ चे कलम १८ अन्वये आदेश 2084

जा.क्र.जिउनि/सावकारी अवैध/१८ अ/२०१५
कार्यालय : जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था
औरंगाबाद दिनांक : २७/०५/२०१५

वाचा : १) श्रीमती आशाबाई शंकर परदेशी, रा.वाकडी ता.सोयगांव जि.औरंगाबाद यांचे तर्फे जनरल मुखत्यार पत्र श्री.बाबूलाल देवचंद परदेशी यांचे कडून प्राप्त तक्रार अर्ज दिनांक ६.२.२०१४

२) या कार्यालयाचे पत्र दि.जा.क्र./प्रशा-३/सा.तक्रार/आशा परदेशी/४०५/२०१४ दिनांक ०६.०२.२०१४

३) टी.एन.गोमलाडू, प्राधिकृत अधिकारी तथा सहकार अधिकारी श्रेणी-१, सहकारी संस्था सोयगांव यांचा चौकशी अहवाल दिनांक ३१.०७.२०१४

४) सहाय्यक निबंधक सहकारी संस्था सोयगांव यांचा अहवाल जा.क्र./सनिसि/सात/आक्षेप/८५१/२०१४ दिनांक ०४.०८.२०१४

५) या कार्यालयाची महाराष्ट्र सावकारी (नियमन) अधिनियम २०१४ चे कलम १८ अन्वये सुनावणी नोटीस दिनांक ०१.०९.२०१४

६) डॉ.डी.डी.पाटील जनरल मुखत्यार तर्फे सौ.विद्या दामोधर पाटील यांचा विनंती अर्ज दि.२२.०९.२०१४

७) मा.उच्च न्यायालय मुंबई खंडपिठ औरंगाबाद यांचे समोर दाखल याचिक क्रमांक ५६२/२०१४ व त्या मधील आदेश दिनांक ०८.०१.२०१५

८) या कार्यालयाची सुनावणी नोटीस जा.क्र./जिउनि/सावकारी/नोटीस क्र.१८/१५/ दि.२८.०१.२०१५

९) दामोधर दयाराम पाटील यांचे तर्फे त्यांचे अधिवक्ते यांना सादर केलेले लेखी म्हणने दि. ०९.०३.२०१५

१०) तक्रारदार यांचेकडून त्यांचे अधिवक्ते यांनी सादर केलेला लेखी युक्तीवाद दि.०६.०४.२०१५ व दि.२९.०४.२०१५

११) या कार्यालयात वेळोवेळी घेण्यात आलेली सुनावणी व त्या मधील युक्तीवाद

१२) आशाबाई शंकर परदेशी यांचेकडून जनरल मुख्यत्यार श्री.बाबूलाल देवचंद परदेशी यांनी दि.२५.०२.२०१५ रोजीच्या अर्जानूसार खरेदी खत अवैध घोषीत करून सदर खरेदी खतामधील जमीन परत मिळणे बाबत सादर केलेला विनंती अर्ज व शपथपत्र

अर्जदार — श्रीमती आशाबाई शंकर पदरेशी
रा.वाकडी ता.सोयगाव जि.औरंगाबाद

गैरअर्जदार — सौ.विद्या दामोधर पाटील
रा.सोयगाव जि.औरंगाबाद

ज्या अर्थी, वाचा क्रं.१ अन्वये श्रीमती आशाबाई शंकर परदेशी रा.वाकडी ता.सोयगांव यांच्या तर्फे जनरल मुखत्यार पत्रा नुसार श्री बाबूलाल देवचंद परदशी यांनी वाचा क्रं. १ नुसार तक्रार सादर केली की, त्यांनी वाकडी आंजोळा शिवारातील शेतजमीन गट नं.७/१ क्षेत्र २ हेक्टर ४२ आर. जमीनी संदर्भात सावकारी करणारे विद्याबाई

दामोधर पाटील रा.सोयगांव जि.औरंगाबाद यांचे विरुध्दात सावकारी गुन्ह्या संदर्भात फिर्याद दिली आहे. पोलीस अधिकाऱ्यांनी फिर्यादीची दखल घेऊन चौकशी करून दि.२८.०३.२००६ रोजी विद्याबाई दामोधर पाटील व दामोधर दयाराम पाटील यांच्यावर प्रतिबंधीत कार्यवाही झाली. परंतु विद्याबाई दामोधर पाटील यांचो आज पर्यंत प्रलंबीत आहे. त्यांनी सावकारी व्यवहारातुन शेताचे खरेदी खत करून दिलेले आहे. विद्याबाइ पाटील व आशाबाई परदेशी यांच्यात सावकारी व्यवहार आहे. व खरेदीखतापासून आजही जमीन त्यांच्या ताब्यांत आहे. २००४-२००५ पासून ते २००८-२००९ पर्यत काही वहिती व सातबारे उतारे त्यांच्याकडे आहे. सावकारी तक्रारीतील तपासामध्ये प्रतिबंध कारवाई मध्ये त्यांचा ताबा दर्शविला आहे. दिनांक २९.०८.२००६ चे पंचनाम्यामध्ये शेताच्या पंचनाम्यामध्ये दामोधर पाटील यांची स्वाक्षरी आहे. २०१४ पर्यंत तहसीलदार कार्यालयात वहितीसबंधी अर्ज दिले आहे.तहसीलदार साहेब यांच्या आदेशावरुन २९.०६.२०१० चे पत्राचे आदेशानुसार विद्याबाई पाटील यांची वहिती लावली आहे. तरी या बाबतची चौकशी करून न्याय मिळवून द्यावा अशी विनंती केली.

या तक्रारीस अनुसरुन वाचा क्रं. २ अन्वये सहाय्यक निबंधक सहकारी संस्था सोयगाव यांना चौकशी करून अहवाल सादर करणे बाबत कळविण्यांत आले त्यानुसार उक्त प्रकरणाची चौकशी त्यांचे कार्यालयातील श्री.टी.एम.गा[illegible] सहकार अधिकारी श्रेणी-१ यांनी करून त्यांनी वाचा क्र. ३ नुसार त्यांचा सविस्तर चौकशी अहवाल सादर केला आहे. वाचा क्रं. ४ नुसार सहाय्यक निबंधक सहकारी संस्था सोयगांव यांनी सदरचा अहवाल त्यांच्या अभिप्रायासह या कार्यालयाकडे सादर केलेला आहे. त्यांनी नमुद केले आहे की, वाचा क्रं. २ नुसार प्राप्त तक्रार अर्जावर आशाबाई शंकर परदेशी यांच्या स्वाक्षऱ्या नसून श्री बाबूलाल देवचंद परदेशी यांनी स्वाक्षऱ्या केल्याचे दिसून येते. या बाबत चौकशी अधिकारी यांनी बाबूलाल देवचंद परदेशी यांना विचारणा केली असता या प्रकरणी आशाबाई शंकर परदेशी यांनी दिनांक १९.०४.२००६ रोजी या प्रकरणी कारवाई करणे, तक्रार अर्जावर सह्या करणे यासाठी त्यांना जनरल मुखत्यार पत्र दिलेले आहे. या कामी चौकशी अधिकारी यांनी दि.२४.३.२०१४ रोजी आशाबाई शंकर परदेशी यांचा जबाब घेतला आहे. चौकशी अधिकारी यांना दिलेल्या जबाबात आशाबाई शंकर परदेशी यांनी सांगीतले आहे की, त्या वाकडी ता.सोयगांव जि.औरंगाबाद येथील रहिवाशी असून व्यवसायाने शेती करतात. त्यांच्या नावाने दिनांक ०५.०२.२०१४ व दिनांक ११.०३.२०१४ अन्वये श्री बाबूलाल देवचंद परदेशी रा.सातगाव ता.पाचोरा जि.जळगांव यांनी सौ.विद्याबाई दामोधर पाटील, डॉ.दामोधर दयाराम पाटील रा.सोयगांव यांच्या विरूध्द अवैध सावकारी बाबत दोन तक्रार अर्ज दिलेले आहे. त्यांनी जबाबात सांगीतले की, त्यानी म्हशी घेण्याकरीता सौ.विद्याबाई दामोधर पाटील रा.सोयगांव यांच्याकडून दिनांक २८.१२.१९९९ रोजी रु.१०५०००/- (अक्षरी रुपये एक लाख पाच हजार मात्र) ३ टक्के दर महिना दर शेकडा अशा व्याजाने कर्जाऊ घेतले होते. त्या बदल्यात त्यांनी त्यांचे आंजोळा शिवारातील गट नं.७/१ मधील शेतजमीन २ हेक्टर ४२ आर. दिनांक २८.१२.१९९९ रोजी सौ.विद्याबाई दामोधर पाटील यांच्या नावाने खरेदीखत करून दिले होते. परंतु सदरची जमीन त्यांच्याच ताब्यात आहे. त्या वयोवृध्द असल्याने त्यांना ऑफीस व कोर्टात चकरा मारणे जमत नाही. त्यामुळे त्यांच्या वतीने ऑफीस व कोर्टाचे काम पाहण्यासाठी त्यांचा मुलगा रमेश शंकर परदेशी यांचे सासरे श्री.बाबूलाल देवचंद परदेशी रा.सातगांव ता.पाचोरा जि.जळगांव यांना दिनांक १९.०४.२००६ रोजी रु.१००/- च्या बॉन्ड पेपरवर मुख्यत्यार पत्र करून दिले आहे. त्यानुसार त्यांनी तक्रार अर्ज दिल्याचे सांगीतले आहे. सदरचे अर्ज चौकशी अधिकारी यांनी त्यांना वाचून दाखवील ते खरे असल्या बाबत त्यास संमंती असल्या बाबत जवाबात

REGISTRAR OF MONEYLENDERS ... AURANGABAD

नमुद केले. तसेच त्यांनी त्यांचे जवाबात सांगीतले आहे की, त्यांनी दि.१८.०२.२००४ रोजी त्यांचे व्याही श्री.बाबूलाल देवचंद परदेशी यांचे समोर सौ.विद्याबाई दामोधर पाटील यांना त्यांच्या वाकडी येथील राहत्या घरी रु.१०००००/- (अक्षरी एक लाख मात्र) परत दिले व उरलेले रु.५०००/- व व्याज शेतजमीन परत पलटवून देताना देण्याचे ठरले होते. पण वेळोवेळी विनंती करूनही सौ.विद्याबाई दामोधर पाटील या त्यांची शेतजमीन पलटवून देत नाही. त्यामुळे बेकायदेशिर सावकारी बाबत त्यांच्यावर कारवाई करावी अशी विनंती जवाबात करून जवाबा सोबत त्यांनी दि.१९.०४.२००६ चे जनरल मुख्यात्यार पत्र कायम खरेदीखताची छायाप्रत त्यांच्या ओळखपत्राची छायांकित प्रत सादर केलेली आहे.

श्री.बाबूलाल देवचंद परदेशी यांनी दिनांक ०५.०२.२०१४ अन्वये दिलेल्या तक्रार अर्जात श्रीमती आशाबाई शंकर परदेशी यांच्या जवाबात नमुद बाबी दिलेल्या आहे. दिनांक ११.०३.२०१४ रोजी दिलेल्या तक्रार अर्जात मुळ तक्रारी व्यतिरिक्त असे नमुद करण्यांत आले आहे की, या व्यवहारा सारखाच व्याजाचा व्यवहार श्रीमती विद्याबाई दामोधर पाटील यांनी घुसर्डी ता.भडगाव जि.जळगांव येथील सरदार रामा परदेशी यांच्या हाती केला असून त्यांचे शेत सौ.विद्याबाई दामोधर पाटील यांचे नावे सावकारी व्यवहाराने शेत गट नं.१०४ मधील जमीनीचे खरेदीखत सन १९९८ मध्ये करून घेतले होते. सन २००५ मध्ये जेंव्हा श्री.सरदार रामा परदेशी यांनी व्याजासह मुद्दल परत केले तेव्हा श्रीमती विद्याबाई दामोधर पाटील यांच्या नावाने परत पलटवून दिले आहे. सदर चौकशी अंतर्गत चौकशी अधिकारी यांनी दिनांक २६.०३.२०१४ रोजी पथकातील सदस्यासह सौ.विद्याबाई दामोधर पाटील यांचे सोयगांव येथील राहत्या घरी पंचासह जावून घर झडती घेतली त्यामध्ये पुढील प्रमाणे कागदपत्रे चौकशीस्तव ताब्यात घेतलेली होती.

REGISTRAR OF MONEY LENDERS AU... DIST. AURANGABAD

१. श्री.सुभाष सखाराम मिसाळ यांचे मुळ खरेदीखत क्र.४३९
२. श्री.कडूबा सखाराम मिसाळ यांचे मुळ खरेदीखत क्र.४३८
३. श्रीमती आशाबाई शंकर परदेशी यांचे खरेदीखत क्र.५६७ ची छायांकित प्रत.
४. श्री.शब्बीर दौलत देशमुख यांचे मुळ खरेदखत क्र. ३०८७
५. श्री.गणपत भागाजी बोडखे यांचे मुळ खरेदखत क्र.५८०
६. श्री.कैलास द्वारकादास नेवाल व रमेश अच्युतराव कुलकर्णी यांचे मुळ खरेदीखत क्र.२८३९
७. श्री.शशीकांत बाबूलाल झवर इतर यांचे मुळ खरेदीखत क्र.५७८५
८. सौ.मिना अशोक अहेरराव यांचे मुळ खरेदीखत क्र.७४०

उक्त प्रकरणी चौकशी अधिकारी यांनी श्रीमती विद्याबाई दामोधर पाटील यांचे पती श्री.दामोधर दयाराम पाटील यांचा जबाब दिनांक २९.०३.२०१४ रोजी नोंदविला. त्यांच्या जबाबात त्यांनी नमुद केले की, ते नारळीबाग ता.सोयगांव येथे राहातात. वैद्यकिय व्यवसाय करतात. त्यांनी दिनांक २८.१२.१९९९ रोजी सौ.आशाबाई शंकर परदेशी रा.वाकडी ता.सोयगाव जि.औरंगाबाद यांची मौजे आंजोळा ता.सोयगांव शिवारातील गट नं.७/१ मधील २ हेक्टर ४२ आर शेतजमीन रु.१०५०००/- या किमंतीस (नोंदणीकृत खरेदीखत) कायमस्वरुपी केलेली आहे. ज्यांचा नोंदणी क्र.५६७ दिनांक २८.१२.१९९९ असा आहे. नोंदणी पुर्वीच पैसे घेतलेले असल्याने सौ.आशाबाई शंकर परदेशी यांनी जमीनीचा ताबा दिलेला आहे. सदरचे खरेदीखत त्यांनी पत्नीचे नावाने नामे सौ.विद्याबाई दामोधर पाटील यांचे नावाने केले आहे. सदर जमीनीच्या खरेदीविक्री बाबत कोणताही वाद नव्हता. खरेदी विक्री नंतर २००६

मध्ये मा.गृह मंत्री यांनी अवैध सावकारी विरुध्द कडक धोरण जाहिर केल्या नंतर त्यांनी सदर जमीनीचे व्यवहार बेकायदेशिर सावकारी अंतर्गत झाल्या बाबत पोलीस स्टेशन सोयगांव येथे खोटी तक्रार दाखल केली. त्यांच्या घरी झालेल्या घर झडती मध्ये ९ रजिस्ट्र्या ७ मुळ व २ छायांकित प्रती ह्या चौकशीसाठी ताब्यात घेतलेल्या आहे. त्या सर्व जमीनीच्या/प्लॉटची खरेदी त्यांनी केलेली असून त्या सर्व दुय्यम निबंधक यांच्या समोर नोंदणीकृत केलेल्या आहे. श्रीमती आशाबाई शंकर परदेशी यांनी सन २००६-२००७ मध्ये तहसील कार्यालय सोयगांव येथे ७ -ब दाखल केलेला होता. त्यांचा निकाल त्यांच्या बाजूने लागलेला आहे.

श्रीमती आशाबाई शंकर परदेशी यांच्या जमीनीचे खरेदीखतावरील साक्षीदार श्री.मन्ना सखाराम पाटील (मगर) यांचा जबाब चौकशी अधिकारी यांनी दिनांक ०२.०६.२०१४ रोजी नोंदविलेला असून त्यात त्यांनी असे नमुद केले आहे की, श्रीमती आशाबाई शंकर परदेशी यांच्या गट नं. ७/१ मधील जमीनीची खरेदी विक्री व्यवहारा मधील ते साक्षीदार असून श्रीमती विद्याबाई दामोधर पाटील यांनी दिनांक २८.१२.१९९९ रोजी कायम खरेदीखता आधारे खरेदी केलेली आहे. परंतु सदर शेतजमीन सौ.आशाबाई शंकर परदेशी यांनी दोन वर्षात सदर व्यवहारातील रक्कम संबधितास देऊन खरेदी पलटवून घ्यावी अशी तोंडी बोली होती असा जबाब दिलेला आहे.

प्रस्तुत तक्रारीतील गट नं.७/१ मधील शेतजमीनीच्या शेजारी शेतकरी १) श्री.अशोक रामा धुमाळ रा.वाकडी ता.सोयगांव, २) गणेश शंकर पालकर, रा.वाकडी ता.सोयगांव, ३) शेख अमीन शेख महमंद, रा.वाकडी ता.सोयगांव, ४) सलाउद्दीन शेख यासीन, रा.वाकडी यांचे जबाब चौकशी अधिकाऱ्यांनी नोंदविलेले असून त्यात त्यांनी नमुद केले आहे की, त्याच्या शेताशेजारी गट नं.७/१ मध्ये शेतजमीन ही आशाबाई शंकर परदेशी यांची असून ह्या शेतामध्ये त्यांचा मुलगा रमेश शंकर परदेशी हे पिक पेरणी व कापणी इत्यादी करतात. या जमीनी मध्ये इतर कोणासही शेती करताना किंवा पिक कापणी करताना पाहीलेले नाही असे जबाब दिलेले आहेत.

REGISTRAR OF MONEY ... AD

श्रीमती आशाबाई शंकर परदेशी यांनी १००/- रुपयाच्या बॉन्डवर तहसील कार्यालय सोयगांव येथे दिनांक ०२.०६.२०१४ रोजी प्रतिज्ञापत्र सादर केले असून त्यात त्यांनी चौकशी अधिकारी यांना दिलेल्या जबाबा प्रमाणेच सर्व बाबी कथन केलेल्या आहे.

या प्रकरणात दि.११.०३.२०१४ च्या तक्रारीत ज्यांचा उल्लेख केलेला आहे. त्या श्री.सरदार रामा परदेशी रा.घुसर्डी ता.भडगांव जि.जळगांव यांनी सुध्दा रु.१००/- च्या बॉन्डवर दिनांक ०२.०६.२०१४ रोजी तहसील कार्यालय सोयगांव येथे प्रतिज्ञापत्र केलेले आहे. त्यात त्यांनी नमुद केले आहे की, ते घुसर्डी येथील रहिवाशी असून त्यांनी दिनांक १६.०४.१९९९ रोजी विद्याबाई दामोधर पाटील यांच्याकडून रु.१०००००/- (अक्षरी एक लाख मात्र )दर महिन्याला ४ रु.प्रती शेकडा या व्याजदराने घेतले होते. सदर रक्कमेचे व्याज त्यांनी दर सहा महिन्याला रु.२४०००/- त्यांनी श्रीमती विद्याबाई दामोधर पाटील यांना दिलेले आहे. या व्याजाने घेतलेल्या रक्कमेस धर म्हणून त्यांनी त्यांची शेतजमीन गट नं.१०४ मधील ८२ आर. शेतजमीन पैकी ५२ आर.शेतजमीन श्रीमती विद्याबाई दामोधर पाटील यांना कायम खरेदीखत करून दिली होती. त्यांनी व्याजाचे दि०७.०४.२००५ पर्यंत नियमित परतफेड दिलेले आहे.तद्नंतर दि०८.०४.२००५ ला घेतलेले रु.१०००००/- मुद्दल व व्याजाचे रु.२४०००/- परत केल्यावर श्रीमती विद्याबाई दामोधर पाटील यांनी श्री.सरदार रामा परदेशी यांची गट नं.१०४ मधील ५२ आर. शेतजमीन कायम खरेदीखाताद्वारे परत पलटवून दिल्याचे प्रतीज्ञापत्रात नमुद केलेले आहे. या चौकशी अहवालात चौकशी अधिकारी यांनी त्यांचे अभिप्रायात नमुद केले आहे की, श्रीमती आशाबाई शंकर परदेशी यांनी श्रीमती

विद्याबाई दामोधर पाटील यांचे कडून रु. १०५००० रु. ३% दर महा दर शेकडा या व्याजदराने घेऊन त्या बदल्यात त्यांनी मौजे आंजोळा ता.सोयगांव शिवारातील गट नंबर ७/१ मधील २ हेक्टर ४२ आर शेतजमीन नोंदणीकृत कायम खरेदीखता आधारे श्रीमती विद्याबाई दामोधर पाटील यांचे नावाने धर म्हणून लिहून दिलेले आहे. खरेदी खतावरील साक्षीदार श्री मन्ना सखाराम मगर यांनी २ वर्षा नंतर रक्कम परत दिल्या नंतर खरेदी पलटून घ्यावी अशी तोंडी बोली होती. उक्त जमीनी शेजारी शेतकरी श्री.अशोक रामा धुमाळ, गणेश शंकर पालकर, शेख अमीन शेख महमंद व शेतकरी सलाउद्दीन शेख यासीन सर्व रा.वाकडी यांनी जमीनीवर आशाबाई शंकर परदेशी यांचा ताबा असून त्यांचा मुलगा ही जमीन कसतो, पहातो या व्यतिरिक्त ही जमीन कसताना त्यांनी कोणालाही पाहिलेले नाही. श्री.सरदार रामा परदेशी यांनी रु.१००/- च्या बॉन्डवर दिलेला जबाबा नूसार श्रीमती विद्याबाई पाटील यांच्या नावाने व्याजाने पैसे घेऊन जमीन लिहून दिलेली व व्याजासह परतफेड झाल्यावर सदरची शेतजमीन त्यांना परत पलटवून दिलेली आहे. यावरून या प्रकरणी बेकायदेशिर सावकारी झालेली आहे. असा चौकशीतील निष्कर्ष दिलेला आहे.

ज्या अर्थी, वाचा क्रं. ५ या कार्यालयाने अर्जदार गैरअर्जदार यांना सुनावणी नोटीस निर्गमित करून त्यांचे लेखी/तोंडी म्हणने मांडण्यासाठी निर्गमित करण्यांत आलेली आहे.

ज्या अर्थी, वाचा क्रं. ५ च्या नोटीसी नूसार व वाचा क्रं. ६ नुसार डॉ.डी.डी.पाटील मुख्त्यार सौ.विद्याबाई दामोधर पाटील दि.०२.०९.२०१४ रोजी अर्ज देऊन त्यात नमुद केले की, या प्रकरणी त्यांनी मा.उच्च न्यायालय मुंबई खंडपिठ औरंगाबाद येथे याचिका क्र.५६२/२०१४ दाखल केलेली आहे व ह्या याचिकेची सुनावणी दिनांक २२.०९.२०१४ रोजी झाली असून त्यात मा.उच्च न्यायालय जैसे थे असा आदेश केलेला आहे. त्यामुळे या प्रकरणी मा.उच्च न्यायालयाचे पुढील आदेशा पर्यंत स्थगीती करावी.

REGISTRAR OF MONEY... DIST. AURANGABAD

ज्या अर्थी, वाचा क्रं. ७ नूसार मा.उच्च न्यायालय मुंबई खंडपिठ औरंगाबाद यांचे समोर दाखल उक्त याचिके मध्ये दिनांक ८ जानेवारी २०१५ चे आदेशा नुसार सदर याचिका याचिकाकर्ते यांना परत घेण्यास मा.उच्च न्यायालयानी परवानगी दिलेली असून व नोटीसीत अनूसरुन या प्राधिकरणा समोर सावकारी (नियमन) अधिनियम २०१४ नुसार संपर्क करणे बाबत (approach) आदेशीत केलेले आहे. त्या नुसार दि.२८.०१.२०१५ चे नोटीसी नुसार अर्जदार व गैरअर्जदार यांना सुनावणी नोटीस निर्गमित करण्यांत येऊन दि.०७.०२.२०१५ रोजी सुनावणी ठेवण्यात आलेली होती. या सुनावणीत अर्जदार, गैरअर्जदार व चौकशी अधिकारी हजर होते. गैरअर्जदार यांच्या वतीने त्यांचे पती मुख्त्यार श्री दामोधर दयाराम पाटील यांनी लेखी विनंती करून म्हणने मांडण्यासाठी वेळ मांगीतला. यावर अर्जदार आणि आशाबाई शंकर परदेशी यांचे मुखत्यार श्री बाबूलाल परदेशी यांनी विनंती केली की, चौकशी अहवाला नुसार कारवाई करण्यांत यावी. त्यांनी सावकारीपोटी जमीन गहाण ठेवली होती. व जमीनीवर ताबा त्यांचाच आहे, पीक पेरासुध्दा त्यांचाच आहे. जमीन सावकारी पोटी प्रतीभूती म्हणून दिलेली असल्याने यातील झालेल्या खरेदीखत क्र.५६७ दिनांक २८.१२.१९९९ हे अवैध ठरवून त्यांची जमीन त्यांना परत करावे असे म्हणने मांडले. या प्रकरणी पुढील सुनावणी दिनांक २५.०२.२०१५ रोजी ठेवण्यात आली होती.

गैरअर्जदार यांच्या वतीने दिनांक २५.०२.२०१५ रोजी ॲड.मोहीत देशमुख हजर झाले. व त्यांनी त्यांचे म्हणने इंग्रजीत सादर केले. तथापि, अर्जदार यांनी त्यांचे म्हणने मराठीत भाषांतर करून देणे बाबत विनंती केली. तसेच अर्जदार व गैरअर्जदार यांनी साक्षीदाराचे जबाब व तोंडी युक्तीवाद यासाठी पुढील सुनावणी दि०९.०३.२०१५ रोजी ठेवण्यात आली. त्यानुसार दि.०९.०३.२०१५ चे सुनावणीस अर्जदार यांच्या वतीने त्यांचे मुखत्यार श्री

बाबूलाल परदेशी हजर गैरअर्जदार यांच्या वतीने त्यांचे मुखत्यार डॉ.दामोधर दयाराम पाटील यांचे वकील ॲड.मोहीत देशमुख हजर झाले. सुनावणी दरम्यान अर्जदार यांना गैरअर्जदार यांनी सादर केलेल्या म्हणण्याचे मराठी रुपांतराची प्रत अर्जदार यांना देण्यात आली. अर्जदार यांच्या वतीने साक्षीदार म्हणून १) सलावद खाँ इब्राहीम खाँ रा.वाकडी ता.सोयगांव २) वाल्मीक रघुनाथ निकम रा.वाकडी, ३) गोविंद बालचंद परदेशी रा.वाकडी, ४) श्री.रमेश पंढरीनाथ निकम रा.वाकडी ता.सोयगाव ५) श्री.ईश्वर फुलचंद राजपूत, रा.वाकडी, ता.सोयगाव ५) किशोर सुधाकर जोशी रा.वाकडी इत्यादी व्यक्ती अर्जदाराच्या सांगण्या वरून हजर होते. सुनावणी रोजी त्यांचे अर्ज त्यांनी लेखी स्वरुपात देऊन त्यात त्यांनी नमुद केले की, आंजोळा शिवारातील गट नं.७/१ मधील २ हेक्टर ४२ आर. जमीन आशाबाई शंकर परदेशी यांची आहे. व आज पर्यंत त्यांच्या ताब्यात आहे. ती जमीन त्यांचा मुलगा एक नातवंड हे करतात. त्यांनी जो व्यवहार केला आहे तो सावकारी आहे असे सुनावणी दरम्यान समक्ष कथन केले.

गैरअर्जदार तर्फे यावर प्राथमिक आक्षेप असा की, सदरील ६ व्यक्तिना कुठल्याही कायदेशिर नोटीस न बजावता अथवा मा.न्यायालयाने आदेश न काढता ते उपस्थित राहीले आहे. करीता त्यांना साक्षीदार म्हणता येणार नाही. तसेच सावकारी अधिनियम कायद्याच्या १८ प्रमाणे झालेल्या चौकशी दरम्यान यातील कुठल्याही व्यक्तीचे साक्षीदारांचे जवाब चौकशी अधिकाऱ्यांनी घेतलेले नाही. तक्रारीत यातील कुठल्याही व्यक्तीचा उल्लेख नाही. व खरेदीखताचे वेळी यातील कोणतीही व्यक्ती साक्षीदार नाही. यातील कुठल्याही व्यक्तीने साक्षीचे शपथपत्र दाखल केलेले नाही. त्यावर अर्जदार यांनी पुढील सुनावणीस शपथ पत्र दाखल करता येईल तसेच गैरअर्जदार यांनी नंतर उलट तपासणी घ्यावी. यासाठी पुढील सुनावणी दि.२३.०३.२०१५ रोजी ठेवण्यात आली होती. या रोजीच्या सुनावणीस अर्जदार व गैरअर्जदार हजर अर्जदार यांच्या वतीने ॲड.संतोष व्ही.मुंढे यांनी पुढच्या तारखेच्या वेळी लेखी युक्तीवाद व पुरावा कायद्याने दाखल करण्यांत येईल असे सांगीतल्याने पुढील सुनावणी दि.०८.०४.२०१५ रोजी ठेवण्यात आली.नंतर पुढील सुनावणी दि.२३.०४.२०१५ रोजी घेण्यात आली. यावेळी गैरअर्जदारांनी ६ साक्षीदारांची शपथपत्रे सादर केले. तद्नंतर दिनांक २९.०४.२०१५ चे सुनावणीस अर्जदार व गैरअर्जदार यांचे वतीने त्यांचे अधिवक्ते हजर गैरअर्जदार यांचे वकील यांनी त्यांचा पुरावा बंद करण्याची विनंती केली. त्यानुसार त्यांचा पुरावा बंद करण्यांत आला. त्यावर अर्जदार यांनी त्यांचे पुरावे दाखल करण्यासाठी व अंतीम सुनावणीसाठी शेवटची संधी म्हणून दि.३०.०४.२०१५ ही तारीख देण्याची विनंती केली. अर्जदार व गैरअर्जदार यांचे समंतीने पुढील सुनावणी दिनांक ३०.०४.२०१५ रोजी ठेवण्यांत आलेली होती. या सुनावणीत अर्जदाराचे अधिवक्ते यांनी गैरअर्जदार यांचे वतीने दाखल पुराव्यावर हरकत घेतली. त्यांचे समंतीने त्यांचा पुरावा बंद करण्यांत आलेला आहे. व या प्रकरणी अंतीम सुनावणीसाठी बंद करण्यांत आलेला आहे व त्यांनी यापुर्वी दाखल केलेला पुरावाच वापरण्यांत यावा अशी विनंती केली. यावर गैरअर्जदार यांचे अधिवक्ते यांनी नमुद केले की, या प्राधिकरणा समोरची कार्यवाही ही अधिनियमाचे कलम १८ नुसार असून या मंचास दिवाणी न्यायालयाचे सर्व अधिकार प्राप्त होतात. तसेच ही दिवाणी प्रक्रिया असल्यामुळे यास साक्षीदाराच्या साक्षीनोंदविण्याचे संपूर्ण अधिकार या मंचास आहे. त्यामुळे अर्जदार यांची हरकत कायदेशिर नसून गैरअर्जदार यांनी सादर केलेल्या पुराव्याचे शपथपत्र या प्रकरणातील पुरावा म्हणून वापरण्यांत यावा अशी विनंती केली. अर्जदार यांचे अधिवक्ते यांनी असे नमुद केले की, सदर पुराव्याचे शपथपत्रे हे कलम १८ प्रमाणे नसून पुराव्याकामी वाचता येणार नाही. सदरील तक्रार ही आशाबाई शंकर परदेशी रा.वाकडी ता.सोयगांव यांनी दिनांक ०५.०२.२०१४ व दि.११.०३.२०१४ अन्वये नवीन अधिनियम



6

२०१४ अन्वये या प्राधिकरणा समोर दाखल केलेले आहे. सदरील तक्रारी मध्ये अर्जदार यांनी दिनांक २८.१२.१९९९ रोजी चे खरेदीखत हे सावकारी स्वरुपाचे असल्याचे व शेतजमीन गट नं. ७/१ क्षेत्र २ हेक्टर ४२ आर. च्या संदर्भात आहे. हे या तक्रारीत नमुद बाबी व सहाय्यक निबंधक सहकारी संस्था सिल्लोड /सोयगांव यांच्या अहवालातील नमुद बाबी त्यांनी सुनावणीच्या वेळी कथन केल्या. व सरदार रामा परदेशी यांचे प्रतीज्ञापत्र व त्यांनी करून दिलेले खरेदीखत दिनांक १६.०४.१९९९ व परत पलटुन घेतलेले खरेदीखत दि.०८.०४.२००५ हे पुरावा म्हणून प्राधिकरणा समोर सादर केले व नमुद केले की, सदरची तक्रार ही सन २०१४ चे अधिनियमा नुसार दाखल केलेली आहे. ज्या मध्ये सावकारीचा धंदा याची व्याख्या कलम ३ नूसार रोख रक्कमेचा किंवा वस्तुच्या स्वरुपात कर्ज देण्याचा धंदा असा आहे. मग तो धंदा अन्य कोणत्याही धंदयाच्या संबंधात अथवा त्यांच्या जोडीने केलेला असो. या अधिनियमा मध्ये कलम १५ मध्ये तारण व्यवसायी याचा अर्थ जो धंदयाच्या सर्व साधारण ओघात कर्ज देतो आणि त्या कर्जाच्या परतफेडीसाठी प्रतीभूती म्हणून तारण स्विकारतो. सदरील अधिनियमा मध्ये कलम २४ येथे अधिनियम ज्या प्रकरणास लागू होतो. त्या संबधी स्पष्टीकरण दिलेले आहे. अर्जदार यांचा अर्ज हा कलम १८ नूसार आहे. व सदरील अधिनियमात असे सांगीतले आहे की, तपासणी चौकशी दरम्यान निदर्शनास आलेल्या वस्तुस्थितीच्या आधारे किंवा कर्जदाराच्या अर्जावरून किंवा अन्या रितीने तपासणीच्या दिनांकापासून किंवा कर्जदाराच्या अर्ज मिळाल्यापासून १५ वर्षाच्या पूर्वीचा विक्री गहाण भाडेपट्टा विनियमन या स्वरुपाने किंवा अन्य स्वरुपाने सावकाराच्या कब्जात येणे अभिप्रेत असलेली कोणतीही स्थावर मालमत्ता ही सावकारीच्या ओघात सावकाराने दिलेल्या कर्जा बद्दल प्रतीभूती म्हणून दिलेल्या मालमत्ते स्वरूपाचे आहे. असे वाटत असेल तर चौकशी अधिकाऱ्या मार्फत हा व्यवहाराच्या स्वरूपाची आणखी चौकशी करता येईल. व सदरील कलम १८ च्या पोटकलम (२) (१) नुसार असे सांगीतले आहे की, या बाबत चौकशी करण्यांत आल्यावर सावकारीच्या ओघात सावकाराने दिलेल्या कर्जा बद्दल प्रतीभूती म्हणून स्थावर मालमत्ता सावकाराच्या कब्जात असल्याची मंचास खात्री पटल्या नंतर त्या वेळी अमलात आलेल्या अन्य कोणत्याही कायद्यात काहीही अंतरभूत असले तरी कारणे लेखी नोंदवून तो सलेख किंवा अभिहंस्तातरण अवैध असल्याचे घोषीत करता येईल. आणि त्या मालमत्तेचा कब्जा ज्याने तो सलेख किंवा अभिहंस्तातरण प्रतीभूती म्हणून निष्पादित केले असेल तर कर्जदाराकडे किंवा यथास्थिती त्यांच्या वारसाकडे किंवा उत्तर अधिकाऱ्याकडे परत करण्याचा आदेश करता येईल तसेच सदरील अधिनियमा मध्ये असे नमुद केले आहे की. दिवाणी प्रक्रिया संहीता १९०८ मध्ये काहीही अंर्तभूत असले तरी कर्जदाराने अर्ज केल्यानंतर न्यायालयात हुकूम नामा धारण करणाऱ्या व्यक्तिला नोटीस देऊन नंतर केंव्हाही असा निर्देश देता येईल की, या बाबत न्यायालयाने न्याय निर्णीत कर्जदार विरुध्द दिलेल्या कोणत्याही हुकूम नाम्यात नमुद केलेली रक्कम न्याय निर्णीत कर्जदाराची परिस्थिती व हुकुम नाम्यात नमुद केलेली रक्कम लक्षात घेऊन न्यायालयास योग्य वाटतील अशा दाव्याकडे शर्तीचे अधिन राहून व असा दिनांकात देण्यात येईल मग तो हुकुमनामा हा अधिनियम अमलात येणाऱ्या दिनांकापूर्वी काढलेला असो किंवा नंतर काढलेला असो. सदर युक्ती वादामध्ये अर्जदार यांनी असे नमुद केले आहे की, सदर व्यवहार हा सावकारी कायद्या नूसार असून अर्जदार यांनी सावकारी अधिनियम २०१४ अन्वये अर्जदार यांना तक्रार दाखल करण्याचा पूर्ण अधिकार आहे. यासाठी दिवाणी प्रक्रिया संहीता कलमाची बाधा येत नाही. पुढे असे नमुद केले की, सावकारी अधिनियम २०१४ हा विशेष कायदा असून तो साधारण कायद्याच्या वरती माणला जातो. या कायद्या नूसार १५ वर्ष पूर्वीच्या प्रकरणात पाठीमागे जावून परिणाम देता येतो. व सदरील परिणामास इतर

कोणत्याही कायद्याची बाधा येत नाही. तसेच चौकशी अधिकाऱ्यांने संपूर्ण कागदपत्राची व्यवस्थित पडताळणी करून चौकशी अहवाल तयार केलेला आहे. तो सावकारी अधिनियम २०१४ नूसार योग्य आहे. तसेच असे नमुद केले की, साक्षीदाराचे जवाब व म्हणने सरदार रामा परदेशी यांचे प्रतीज्ञापत्र असे सिध्द करते की, सदरील व्यवहार हा सावकारी व्यवहार आहे. तसेच प्रतीवादी यांनी दाखल केलेल्या पुराव्याचे शपथपत्र यांचा सदरील तक्रारी सदर्भात कशाही प्रकारे उल्लेख केलेला नाही. त्यामुळे सदरील शपथपत्र हे व्यवहार हा सावकारी स्वरुपाचा नाही असे दार्खविण्यासाठी दाखल केला आहे. त्यामुळे पुरावे व नवीन अधिनियमा नूसार अर्जदार यांची विनंती अर्ज मंजूर करून दिनांक २८.१२.१९९९ चे खरेदीखत अवैध ठरवुन कलम १८ नूसार जमीन परत मिळावी अशी विनंती केली.

गैरअर्जदार यांचे अधिवक्ते श्री.देशमुख यांनी सुनावणीच्या वेळी नमुद केले की, सदरील तक्रार ही दिवाणी प्रक्रिया संहीताच्या कलम ११ च्या बाहेर असून ती या प्राधिकरणा समोर चालविता येणार नाही. तसेच तक्रारदार यांनी हेतुपुरस्कर पध्दतीने त्यांचे विरोधात झालेले विविध न्यायालयाचे न्यायनिर्णय या प्राधिकरणा पासून लपवून दिशाभूल केलेली आहे. या स्वरुपाची तक्रार त्यांनी दि.१३.०७.२००९ रोजी केली असून त्यामध्ये चौकशी अधिकारी यांनी सदरील तक्रारीत तथ्य नसून सदर व्यवहार खरेदी विक्री व्यवहार आहे. अशा पध्दतीने या व्यवहारासंबंधी या मंचानेच दिनांक १९.०१.२०१० रोजी निर्णय देऊन प्रकरण बंद केले होते. सदर प्रकरण पुन्हा चालविण्यास कलम ११ सी.पी.सी.प्रमाणे मनाई आहे. अर्जदार यांनी सदरील व्यवहार हा मा.दिवाणी न्यायालया समोर २००६ साली आव्हानीत केला होता. मा.दिवाणी न्यायालयाच्या निर्णया नंतर गैरअर्जदार यांनी नियमित दिवाणी अपिल १०६०/२००७ हे मा.जिल्हा न्यायालयापुढे दाखल केले होते. सदरील प्रकरणात तक्रारदार यांनी नोंदणीकृत खरेदीखत क्रं.५६७ हा खरेदी विक्री व्यवहार नसुन तारण व्यवहार असल्याचे म्हणने मांडण्यांचा व सिध्द करण्याचा प्रयत्न केला होता. मा.जिल्हा न्यायालयाने संपूर्ण कागदपत्राचा व साक्षीदाराचा विचार करून सदरील व्यवहार खरेदी विक्री व्यवहार असल्याचा न्यायनिवाडा दिनांक ०६.११.२००९ रोजी दिला होता. या संबधीचे सखोल निष्कर्ष या निवड्याचे उत्तारा क्र.१७ मधे देण्यात आलेले आहेत. परंतु हे निर्णय अर्जदार यांच्या विरोधात असल्याने त्यांनी ही हकिगत या मंचापासून लपवून ठेवण्याचा प्रयत्न केलेला आहे. तसेच नियमित दिवाणीदावा क्र.१६० हा २००५ मधील न्यायनिवडा अर्जदार यांनी मा.उच्च न्यायालयासमोर आव्हानित केलेला होता. मा.उच्च न्यायालयाने दुसरे अपिल क्रं. २६७/२००९ यावरील सुनावणी दरम्यान असे निष्कर्ष काढले की, सदरील दुसऱ्या अपिलात Substantial question of law नसल्या कारणाने व मा.जिल्हा न्यायालयाचे आदेश हे कायद्याने धरून असल्याने दुसरे अपिल खारीज करण्यांत आले. अशा प्रकारे अर्जदार यांनी २००६ साला पासून विविध न्यायालया समोर सदरील व्यवहार आव्हानित करून हा व्यवहार सावकारी व्यवहार असल्याचे दार्खविण्याचा प्रयत्न केला होता. परंतु सर्व न्यायालयाने सर्व कागदपत्राचा विचार करून हा खरेदी विक्री व्यवहार असल्याने निष्कर्ष नोंदविले आहे. करीता केवळ एक नवीन कायदा अस्तित्वात असल्याने पूर्वी देण्यात आलेले न्यायनिर्णय चूकीचे ठरविता येणार नाही. अशा प्रकारची प्राथमिक हरकत नोंदवून गैरअर्जदार यांनी पुढे असे नमुद केले आहे की, आंजोळा येथील गट क्रमांक ७/१ मधील २ हेक्टर ४२ आर. एवढी जमीन दिनांक २८.१२.१९९९ रोजी कायम खरेदीखत क्रमांक ५६७ द्वारे रु.१०५०००/- एवढ्या बाजार भावात गैरअर्जदार यांनी अर्जदार यांच्याकडून कायम स्वरुपी खरेदी केलेली आहे. सदरचे व्यवहारात श्री.बसवराज महादू पाटील हे साक्षीदार असून त्यांचे पुराव्याचे शपथपत्र मध्ये त्यांनी असे नमुद केले आहे की, दि.२८.१२.१९९९ रोजी झालेला व्यवहार हा खरेदी विक्रीचा आहे व त्यांच्या सावकारी

व्यवहाराचा कुठलाही संबंध नाही. गैरअर्जदार यांनी असे नमुद केले की, सदरील साक्षीदार यांची साक्ष मा.दिवाणी न्यायालया समोर घेण्यात आली होती. व अर्जदार यांच्या मार्फत त्यांचा उलट तपासही घेण्यात आलेला होता. या साक्षीदाराचे साक्षी व्दारे ही सिध्द झाले आहे की, सदरचा व्यवहार हा खरेदी विक्रीचा आहे. गैरअर्जदार यांचे अधिवक्ते यांनी असा युक्तीवाद केला की, अर्जदार यांनी सरदार रामा परदेशी यांचे जोडलेले शपथपत्र गृहीत धरता येणार नाही. कारण सदरील सरदार रामा परदेशी हे अर्जदार यांचे जवळील नातलग आहे. व अर्जदार यांना मदत करण्याच्या उद्देशाने त्यांनी खोटी तक्रार नोंदविली आहे. सदरील व्यवहार हा देखील हा खरेदी विक्री व्यवहार होता. सदरील व्यवहार हा रु.१४२०००/- एवढ्या किमंतीत नोंदणी खरेदीखत क्रं.३८ द्वारे दिनांक २६.०४.१९९९ रोजी झाला होता. दिनांक २००४-२००५ साली गैरअर्जदार यांनी स्वतःचे घराचे बांधकाम केल्याने तसेच दवाखान्याचे नुतणीकरण व बांधकाम केल्याने त्यांना आर्थीक अडचण होती. सदरील आर्थीक अडचणीस तो त्यांनी सरदार रामा परदेशी कडून विकत घेतलेली जमीन विक्री करण्याचा मानस गैरअर्जदार यांचे सासरे श्री.शंकर परदेशी यांच्याकडे व्यक्त केला. त्यावर शंकर परदेशी यांनी सरदार परदेशी हे माझे नातेवाईक असून ते सदरील जमीन पुन्हा विकत घेण्यास तयार असल्याने सांगीतल्याने गैरअर्जदार यांनी अडचणीस्तव तयार असल्याचे सांगीतल्याने गैरअर्जदार यांनी आर्थिक अडचणीस्तव ती जमीन रु.१४२०००/- एवढ्या किमंतीस गैरअर्जदार यांनी खरेदी केली होती ती जमीन गैरअर्जदार यांनी रु.१२४०००/- मधे म्हणजे कमी किमंतीस विक्री केलेली आहे. दोन्ही व्यवहार हे नोंदणीकृत पध्दतीने झालेले खरेदी विक्री व्यवहार असून याचा सावकारी व्यवहाराशी संबंध नाही. कलम १६ अंतर्गत झालेल्या चौकशीच्या वेळी जी काही खरेदीखत गैरअर्जदार यांच्याकडे मिळाले ते सर्व खरेदी विक्रीचे असल्याचे शपथेवर नमुद केलेले आहे. गैरअर्जदार यांचे पती हे वैद्यकिय व्यवसाय करत असून ते सामाजिक प्रसिध्द व्यक्ती आहे. त्यांनी केलेले सर्व व्यवहार हे खरेदी विक्रीचे व्यवहार आहे. अर्जदार यांनी केलेली तक्रार खोटी असल्याने ती रद्द करण्यांत यावी अशी विनंती केली.

REGISTRAR OF MONEY LENDERS ... ABAD

या नंतर अर्जदाराचे अधिवक्ते यांनी युक्तीवाद केला की, गैरअर्जदार यांनी नमुद केलेला दावा RCS ७/२००६ त्यांचेच लेखी उत्तर दिनांक ०९.०३.२०१५ मधील परिच्छेद क्रं. १५ प्रमाणे कायम स्वरुपी मनाई हुकमाचा होता. या उलट सदरील अर्ज हा सावकारी अधिनियम २०१४ नुसार दाखल केलेला असल्याने दिवाणी प्रक्रिया संहिता कलम ११ ची बाधा येत नाही. तसेच अर्जदार याचे अधिवक्ते यांनी नमुद केले की,दिनांक १३.०३.२००९ रोजी केलेला अर्ज हा सावकारी अधिनियम २०१४ अंमलात येण्यापूर्वी केला होता. त्यामुळे त्यास सुध्दा दिवाणी प्रक्रिया संहीता कलम ११ नुसार बाधा येत नाही व सदरचा अर्ज हा विशेष कायदा सावकारी अधिनियम २०१४ नुसार केलेला असल्याने दिवाणी प्रक्रियासंहीता व इतर कोणत्याही कायद्यानूसार अवैध होत नाही असे या अधिनियमात सांगीतलेले आहे असा युक्तीवाद केला. तसेच अर्जदार व गैरअर्जदार यांनी सादर केलेले युक्तीवादामध्ये त्यांनी सुनावणीचे वेळी या बाबी सांगीतल्या त्याचाच समावेश लेखीयुक्तीवादा मध्ये केलेला आहे.

त्या अर्थी, वरील प्रमाणे अर्जदार व गैरअर्जदार यांचे अधिवक्ते यांनी केलेल्या युक्तीवाद व पुराव्याचे शपथपत्र चौकशी अधिकारी यांचा चौकशी अहवाल या वरुन असे दिसून येते की, श्रीमती आशाबाई शंकर परदेशी रा.वाकडी ता.सोयगांव यांनी सौ.विद्याबाई दामोधर पाटील यांना रु.१०५०००/- मध्ये त्यांच्या गट नं.७/१ मधील शेतजमीन क्षेत्र २ हेक्टर ४२ आर. आंजोळा शिवारातील कायम खरेदी खताद्वारे दुय्यम निबंधक यांचे समोर दिनांक २८.१२.१९९९ रोजी करून दिलेले आहे.

श्रीमती आशाबाई शंकर परदेशी यांच्या म्हणने नुसार त्यांनी म्हशी घेण्याकरीता सौ.विद्याबाई दामोधर पाटील रा.सोयगांव यांच्याकडून दिनांक २८.१२.१९९९ रोजी रु.१०५०००/- द.मा.द.शे ३% दराने कर्जाऊ घेतले होते. या रक्कमेस धर म्हणून त्यांनी त्यांचे बद्दल्यात आंजोळा शिवारातील गट नं.७/१ मधील शेतजमीन २ हेक्टर ४२ आर. दिनांक २८.१२.१९९९ रोजी सौ.विद्याबाई दामोधर पाटील रा.सोयगांव यांच्या नावाने खरेदीखताद्वारे लिहून दिलेली आहे. व सदरची शेतजमीन त्यांच्याच ताब्यात आहे. तसेच त्यांनी दिनांक १८.०२.२००४ रोजी व्याही श्री बाबूलाल देवचंद यांचे समोर सौ.विद्याबाई दामोधर पाटील यांना त्यांच्या वाकडी येथील राहाते घरी रु.१०००००/- रुपये दिले व उरलेले रु.५०००/ व त्यावरील व्याज देवुन जमीन पलटवून द्यावयाचे ठरले होते. तथापि, त्यांनी वेळोवेळी विनंती करूनही सौ.विद्याबाई दामोधर पाटील यांनी जमीन परत पलटवून दिलेली नाही.

श्रीमती आशाबाई शंकर परदेशी यांच्या जमीनीची खरेदीखतावरील साक्षीदार श्री मन्ना सखाराम (मगर ) पाटील यांनी चौकशी अधिकारी यांना दिनांक ०२.०६.२०१४ रोजी दिलेला जवाबा नूसार ते या शेतजमीनीच्या खरेदी विक्री व्यवहारास साक्षीदार असून श्रीमती विद्याबाई दामोधर पाटील यांनी दिनांक २८.१२.१९९९ रोजी कायम खरेदी खता आधारे जमीन खरेदी केलेली आहे. तथापि, सदर शेतजमीन आशाबाई शंकर परदेशी यांनी २ वर्षात सदर व्यवहारातील रक्कम संबंधीतास देऊन खरेदी पलटवून द्यावी अशी तोंडी बोली होती असा जबाब दिलेला आहे. सदरील गट नं.७/१ मधील शेतजमीनीच्या शेजारी शेतकरी १) श्री.अशोक रामा धुमाळ रा.वाकडी २) श्री.गणेश शंकर पाटेकर रा.वाकडी ता.सोयगांव ३) शेख अमीन शेख महमंद, रा.वाकडी, ४) श्री.शेख सलाउद्दीन शेख यासीन रा.वाकडी यांनी चौकशी अधिकारी यांनी दिलेल्या जबाबात असे नमुद केले आहे सदरची शेतजमीन ही आशाबाई शंकर परदेशी यांचा मुलगा रमेश शंकर परदेशी कसत असून त्याचे व्यतिरिक्त या जमीनीमध्ये काम करताना त्यांनी इतरांना पाहिलेले नाही.

सदर जमीनीचा ७/१२ उत्तारा नोंदी नुसार व झालेल्या ७-ब नुसार सन २००८-२००९ पर्यंत जमीनीचा पीकपेरा आशाबाई परदेशी यांचा असल्याचे दिसून येते.तहसिलदार यांचे आदेश दिनांक २६.०३.२०१० नुसार सदरचा पिकपेरा सन २००९-२०१० या वर्षा पासून सौ.विद्याबाई दामोधर पाटील यांच्या नावाने झालेला दिसून येतो.

श्री.सरदार रामा परदेशी रा.घुसर्डी ता.भडगाव जि.जळगांव यांनी रु.१००/- च्या बॉन्डवर दिनांक ०२.०६.२०१४ रोजी तहसील कार्यालय सोयगांव येथे प्रतीज्ञापत्र केलेले असून ते त्यांनी चौकशी अधिकारी यांना सादर केलेले आहे. त्यात त्यानी असे नमुद केले आहे की, ते घुसडी येथील रहीवाशी असून त्यांनी दिनांक १६.०४.१९९९ रोजी विद्याबाई दामोधर पाटील यांच्याकडून रु.१०००००/- मात्र दर महिन्याला ४/- रु.प्रतीशेकडा या व्याज दराने घेतले होते. सदरचे व्याज दर ६ महिन्याला रु.२४०००/- यांनी श्रीमती विद्याबाई दामोधर पाटील यांना अदा केलेले आहे. या रक्कमेस धर म्हणून त्यांनी त्यांची गट नं.१०४ मधील ८२ आर.शेतजमीन दिनांक १६.०४.१९९९ रोजी खरेदी खताद्वारे श्रीमती विद्याबाई दामोधर पाटील यांना लिहून दिलेली होती. या घेतलेल्या रक्कमेची मुदत व व्याजासह परतफेड झाल्यावर त्यांनी त्यांची शेतजमीन दुय्यम निबंधक यांचे समोर परत केलेल्या खरेदी खताद्वारे दिनांक ०८.०४.२००५ रोजी परत पलटून घेतलेली आहे. याचा पुरावा म्हणून अर्जदार यांचे अधिवक्ते यांनी सुनावणी दरम्यान शेतजमीनीच्या दोन्ही खरेदी खताच्या प्रती सादर केलेल्या आहे. सदरचे पहिले खरेदी खतामध्ये दिनांक २६.०४.१९९९ रोजी जमीन विक्री किमंत रु.१४२०००/- नमुद असून ६ वर्षानंतरचे दिनांक ०८.०४.२००५ रोजी केलेल्या खरेदी खताद्वारे विक्री किमंत रुपये १२४०००/- नमुद आहे. सुनावणी दरम्यान

अर्जदार यांचे अभिवक्ते यांनी पुराव्यासाठी दिनांक ०९.०३.२०१५ रोजी पुढील नमुद साक्षीदाराचे अर्ज सादर केले आहे. १) सलावद खॉ इब्राहीम खॉ पठाण रा.मु.वाकडी ता.सोयगांव २) वाल्मीक रघुनाथ निकम, मु.वाकडी ता.सोयगांव ३) गोविंद बालचंद परदेशी रा.वाकडी ता.सोयगांव, ४) रमेश पंढरीनाथ निकम, रा.वाकडी ता.सोयगांव ५) ईश्वर फुलचंद राजपूत, रा.वाकडी ता.सोयगांव ६) किशोर सुधाकर जोशी रा.वाकडी ता.सोयगांव या सर्वांचे अर्जात असे नमुद केले की, अंजोळा शिवरातील गट नं. ७/१ मधील २ हेक्टर ४२ आर. ही जमीन आशाबाई शंकर परदेशी यांची असून ही जमीन त्यांच्याच ताब्यात आहे व ती जमीन त्यांची मुले सुना व नातवंड कसतात त्यांनी जो व्यवहार केला आहे तो सावकारी व्यवहार आहे.

गैरअर्जदार यांचे तर्फे जनरल मुखत्यार त्यांचे पती डॉ.दामोधर दयाराम पाटील यांनी चौकशी अधिकारी यांचे समोर दिनांक २९.०३.२०१४ रोजी जवाब नोंदविला आहे त्यात त्यांनी असे नमुद केले आहे की, ते नारळीबाग सोयगांव येथे राहत असून वैद्यकीय व्यवसाय करतात त्यांनी दिनांक २८.१२.१९९९ रोजी सौ.आशाबाई शंकर परदेशी रा.वाकडी ता.सोयगांव यांचे कडुन त्यांची अंजोळा ता.सोयगांव शिवारातील गटनंबर ७/१ मधील २ हेक्टर ४२ आर शेतजमीन रु १०५०००/- मध्ये कायमस्वरुपी खरेदी केलेली आहे.या जमीनीचे खरेदी खत दुय्यम निबंधक यांचे समोर नोंदणी क्रं ५६७ दिनांक २८.१२.१९९९ नुसार केलेले आहे.व आशाबाई शंकर परदेशी यांनी त्यांना जमीनीचा ताबा दिलेला आहे.सदरचे खरेदीखत त्यांनी पत्नीचे नावाने केलेले आहे.व २००६ पर्यन्त या जमीनीचा वाद नव्हता ते जमीन कसत होते. तद्नंतर २००६ मध्ये मा.गृहमंत्री यांनी अवैध सावकारी बाबत कडक धोरण केल्या नंतर सदर जमीनीचे व्यवहार बेकायदेशिर सावकारी अंतर्गत झाल्या बाबत सोयगांव पोलीस स्टेशनला खोटी तक्रार दाखल केली. त्यानंतर त्यांनी वेळोवेळी जमीन कसण्यास अडचण निर्माण केल्याने या प्रकरणी सोयगांव न्यायालयात दावा क्र.७/२००६ दाखल केला होता. यात त्यांना जमीनीत येण्यास मनाई केली होती. तद्नंतर मा.जिल्हा न्यायालयात व मा.उच्च न्यायालयात अपिल दाखल केले होते ते फेटाळण्यात आलेले आहे. सन २००९ मध्ये अशीच तक्रार त्यांनी दिल्याने त्यामध्ये पुरावे व जवाब सादर केलेले आहे. श्रीमती आशाबाई परदेशी यांना २००६-२००७ साली ७-ब दाखल केलेला होता त्याचा निकाल त्यांच्या बाजूने लागलेला आहे. तक्रारदार त्यांना त्रास देत आहे. गैरअर्जदार यांचे अधिवक्ते यांनी सुनावणीचे वेळी जे पुराव्याचे शपथपत्र सादर केले आहे त्यामध्ये श्री.बछराज महादू पाटील रा.लासूरे ता.पाचोरा जि.जळगांव यांच्या शपथपत्रात नमुद केले आहे की, ते आशा शंकर परदेशी यांचे पती शंकर घुमसिंग परदेशी रा.सावखेडा ता.पाचोरा जि.जळगांव यांना व विद्या दामोधर पाटील तसेच त्यांचे पती यांना २० वर्षा पासून ओळखतात श्री.शंकर घुमसिंग परदेशी यांनी पत्नीच्या नावावरचे आंजोळा येथील गट नं.७/१ मधील पैशाची गरज असल्यामुळे विक्री करावयाची आहे असे सांगीतले. त्या नंतर त्यांनी परिचयातील सोयगांव येथील दामोधर दयाराम पाटील यांना या बाबत माहिती दिली. गुंतवणूक म्हणून ही जमीन खरेदी करावयाची अशी विनंती केली. त्यांनी सदरची जमीन २८.१२.१९९९ रोजी कायम खरेदीखताद्वारे झालेला असून या मध्ये सावकारी व्यवहार नाही.

गैरअर्जदार यांनी सुनावणीचे वेळी आणखी काही साक्षीदाराचे पुराव्याचे शपथपत्र सादर केले आहे ते असे

१) अशोक भगवंतराव अहिरराव रा.धाडने ता.साक्री जि.धुळे

२) मिना अशोक अहिरराव रा.धाडने ता.साक्री जि.धुळे

३) शब्बीर दौलत देशमुख, रा.सोयगांव ता.सोयगांव

४) कडूबा सखाराम मिसाळ, रा.आमखेडा ता.सोयगांव

५) निलेश सुभाष मिसाळ, रा.आमखेडा ता.सोयगांव

६) शांताबाई मुरलीधर आगे रा.आमखेडा (रामजीनगर) ता.सोयगांव

सदर पुराव्याचे १ ते ६ शपथपत्र हे विद्याबाई दामोधर पाटील व दामोधर दयाराम पाटील यांचे इतर मालमत्तांच्या खरेदी विक्री व्यवहाराशी संबंधीत आहेत. त्यांचा आशाबाई शंकर परदेशी यांच्या व्यवहाराशी संबंध नाही. तसेच श्री.बछराज महादू पाटील रा.लासुरे ता.पाचोरा जि.जळगांव यांनी जे शपथपत्र सादर केले आहे त्यामध्ये त्यांनी नमुद केले आहे की, ते आशाबाई शंकर परदेशी व डॉ.पती,पत्नीना ओळखतात व अर्जदार आशाबाई यांचे पती शंकर परदेशी यांच्या सुचने नुसार त्यांनी जमीन विक्री असल्याने गुंतवणूक म्हणून खरेदी करण्यांस सांगीतले. डॉ.पाटील यांनी जमीनीची खरेदी केलेली आहे. सदरचा व्यवहार हा खरेदी विक्रीचा आहे. व खरेदी खत झाल्या पासून या जमीनीचा कब्जा व मालकी हक्क सौ.विद्याबाई दामोधर पाटील यांच्याकडे आहे.

सदरचे पुराव्याचे शपथपत्र तेवढे विश्वासार्ह नाही कारण सदरील शपथपत्र सादर करणारे उपरोक्त नमुद सहा साक्षीदाराचे प्रस्तुत दाव्यातील खरेदी खताचे व्यवहारात कुठेही स्वाक्षरी नाही. व संबंध नाही. तसेच जमीनीच्या कब्जा बाबत अव्हानीत दाव्यातील जमीनी शेजारील शेतकऱ्यांनी या जमीनीचा कब्जा अर्जदार यांचा असल्याचे सांगीतले आहे. तसेच गैरअर्जदार यांनी सदरील पुराव्याचे शपथपत्र वा त्यांचा जबाब चौकशी अधिकाऱ्याकडे सादर केले नाहीत.

अर्जदार यांनी जे पुरावे व साक्षी सादर केलेल्या आहे त्या विश्वासार्ह आहेत. कारण खरेदी खतावरील साक्षीदार श्री मन्ना सखाराम (मगर ) पाटील यांनी त्यांचे जबाबात नमुद केले आहे की, खरेदी खताचे दोन वर्षा नंतर शेतजमीन परत पलटून देण्याचे ठरले होते. जमीनी शेजारील शेतकरी १) श्री.अशोक रामा धुमाळ रा.वाकडी २) श्री.गणेश शंकर पालकर रा.वाकडी ता.सोयगांव ३) शेख अमीन शेख महमंद, रा.वाकडी, ४) श्री.शेख सलाउद्दीन शेख यासीन रा.वाकडी यांनी जमीनीचा ताबा अर्जदार आशाबाई परदेशी यांचा असल्या बाबत जबाब दिलेला आहे. तसेच सुनावणीचे वेळी इतर साक्षीदार यांनी जे साक्षी बद्दलचे अर्ज सादर केलेले त्यामध्ये सदर जमीनीचा व्यवहार सावकारी अंतर्गत असून जमीनीचा ताबा अर्जदार यांचा असल्याचे नमुद आहे.

तसेच विद्याबाई दामोधर पाटील व सरदार रामा परदेशी यांच्यातील व्यवहार हा अवैध सावकारी संबधात असल्याचे श्री सरदार रामा परदेशी यांच्या जबाबावरून व शेतजमीनीच्या परतीच्या खतावरुन दिसून येते. तसेच जमीनीचे खरेदी खतापासून सन २००८-२००९ पर्यंत जमीनीचा ताबा ७-ब नुसार अर्जदार आशाबाइ परदेशी यांचा असल्याचे ७/१२ उत्ताऱ्यावरून दिसून येते. सन २००९-२०१० पासून या जमीनीवर पीकपेरा विद्याबाई दामोधर पाटील यांच्या नावाने झाला असल्याचे दिसून येते. यावरुन जमीनीचा प्रत्यक्ष ताबा/ कब्जा हा आशाबाई शंकर परदेशी यांचा असल्याचे दिसून येते. वरील पुरावे पहाता आणि चौकशी अधिकारी यांचा अहवाल पाहता या शेतजमीनीच्या व्यवहारात अवैध सावकारी असल्याचे सकृत दर्शनी दिसून आलेले असून जमीनीचे खरेदी खत क्रमांक ५६७ दिनांक २८.१२.१९९९ हे सावकारीचे ओघात प्रतीभूती म्हणून दिले असल्याचे माझी खात्री झालेली आहे. त्यामुळे खरेदीखता मधील मौजे आंजोळा ता.सोयगांव येथील गट नं.७/१ मधील २ हेक्टर ४२ आर. जमीनीचे खरेदीखत क्रमांक ५६७ दिनांक २८.१२.१९९९ अवैध असल्याचे घोषीत करणे व ते रद्द करून अर्जदार

हंस्तातरणकार मुळ मालक आशाबाई शंकर परदेशी रा.वाकडी ता.सोयगांव यांना परत करण्या करीता व त्या प्रमाणे जमीनीचे मालकी हक्का बाबत सक्षम अधिकारी यांनी फेरफार करणे कामी पुढील प्रमाणे आदेश देत आहे.

**- : आदेश :-**

मी एन.व्ही.आघाव सावकारांचे जिल्हा निबंधक तथा जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था औरंगाबाद महाराष्ट्र सावकारी (नियमन) अधिनियम २०१४ चे कलम १८ नुसार प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून गैरअर्जदार सौ.विद्याबाई दामोधर पाटील रा.नारळीबाग, सोयगांव, मौजे आंजोळा ता.सोयगांव शिवारातील गट ७/१ मधील २ हेक्टर ४२ आर. जमीनीचे खरेदीखत क्रमांक ५६७ दिनांक २८.१२.१९९९ रोजी अर्जदार आशाबाई शंकर परदेशी यांनी करून दिलेले खरेदीखत सावकारीपोटी प्रतिभुती असल्याने अवैध असल्याचे घोषीत करण्यांत येत आहे. सबब सदर खरेदीखत रद्द करून सदर शेतजमीन ही महाराष्ट्र सावकारी (नियमन) अधिनियम २०१४ चे कलम १८ अन्वये हंस्तातरणकार श्रीमती आशाबाई शंकर परदेशी यांना परत करण्यांत येत आहे. सदर बाबत सक्षम अधिकारी यांनी तशी फेरफार नोंद करावी.

सदर आदेश आज दिनांक २०/११/२०१५ रोजी माझे सही व कार्यालयाचे मुद्रेसह पारीत केला आहे.

(एन.व्ही. आघाव)
सावकाराचे जिल्हा निबंधक
तथा जिल्हा उपनिबंधक
सहकारी संस्था औरंगाबाद

प्रत :-

१) अर्जदार व गैरअर्जदार यांचे अभियोक्ते यांना माहितीस्तव.

२) मा.उपविभागीय अधिकारी सिल्लोड यांना पुढील कार्यवाहीस्तव व माहितीस्तव रवाना.

३) मा.तहसीलदार सोयगांव यांना पुढील कार्यवाहीस्तव देण्यांत येते.

४) तलाठी अंजोळा ता.सोयगांव यांना देऊन कळविण्यांत येते की, उक्त प्रकरणात योग्य ती कार्यवाही करावी.

५) सहाय्यक निबंधक सहकारी संस्था सिल्लोड/सोयगांव यांना माहितीस्तव रवाना

**प्रत माहितीस्तव सनियन सादर.**

१) मा.सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य पुणे.

२) मा.विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था औरंगाबाद.

सावकाराचे जिल्हा निबंधक
तथा जिल्हा उपनिबंधक
सहकारी संस्था औरंगाबाद